Letter - 3/10/1989

# हिन्द मजदूर किसान पंचायत

## HIND MAZDOOR KISAN PANCHAYAT

**— NATIONAL HEADQUARTERS —**

204, Raja Rammohan Roy Marg, Bombay 400 004.

Telephone : 355336 / 355337
Telegrams : Laborunion

राष्ट्रीय मुख्यालय :
२०४, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाम, बम्बई - ४०० ००४.

दिनां : ३/ १० / १९८९.

प्रति,

मा० मुख्य वार्ताहर,

दैनिक ~~--------~~ घोषणा
मुंबई
====

महोदय,

कृपया सोबतच्या वृत्तात आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्धी द्यावी. ही नम्र विनंती.

धन्यवाद

-आपला विश्वासू

(शंकर साळवी)

सरचिटणीस

हिंद मजदूर किसान पंचायत (महाराष्ट्र)

टेलि: ३५५३३६-७

२०४, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाव, मुंबई: ४०० ००४

## हिंद मजदूर किसान पंचायतचे २-दिवसीय अधिवेशन संपन्न

## भ्रष्टाचाराच्या उच्चाटनासाठी कामगार संघटनांनी कंबर कसावी

– मृणाल गोरे

नागपूर दि. १ ऑक्टोबर, १९८९

भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कामगार संघटनांनी भ्रष्टाचार विरोधी लढ्यांत आघाडीवर राहावे, असे आवाहन २९-३० सप्टेंबर, १९८९ रोजी एस. एम. जोशी नगर, बचत भवन, सीताबर्डी, नागपूर येथे भरलेल्या हिंमकिपं(महाराष्ट्र) च्या द्विवार्षिक राज्य अधिवेशनाचे उद्घाटन करताना विरोधी पक्ष नेत्या आमदार श्रीमती मृणाल गोरे ह्यांनी केले. कामगार संघटनांनी वेळीच हे कार्य केले नाही तर ह्या संघटना केवळ वैयक्तिक स्वार्थ साधण्याची केन्द्रे ठरतील, असेहि त्या पुढे म्हणाल्या.

ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे भूतपूर्व बांधकाम मंत्री व महाराष्ट्र जनता दलाचे विद्यमान सरचिटणीस श्री. जगन्नाथ जाधव होते. प्रमुख वक्ते म्हणून खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते, लाडली मोहन निगम, रघु ठाकूर, शरद राव, बी. जी. मेश्राम इत्यादि होते. ह्या अधिवेशनास संपूर्ण महाराष्ट्रातील हिंमकिपं संलग्न संघटनांचे पदाधिकारी व सुमारे १५०० प्रतिनिधी हजर होते.

अधिवेशनाच्या कार्यकर्ता संम्मेलना अगोदर कार्यकारिणीची बैठक विदर्भ राष्ट्रभाषा प्रचार समिती येथे झाली. कार्यकर्ता संम्मेलनात नागपूर येथील कामगार नेते श्री. मन्नु दत्ता ह्यांनी स्वागताध्यक्ष पदावरून उपस्थितांचे मन:पूर्वक स्वागत केले.

सामाजिक, राजकीय आणि कामगार चळवळीशी ज्यांचे घनिष्ट संबंध होते अशा अहवाल काळांत दिवंगत झालेल्या नेते व कार्यकर्त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

...(२).

श्रीमती मृणाल गोरे आपल्या भाषणांत पुढे म्हणाल्या की, आज देशांत भ्रष्टाचाराने न ग्रासलेले एकहि क्षेत्र उरलेले नाही. सा-या आर्थिक आणि सामाजीक समस्यांच्या मूळाशी भ्रष्टाचाराचा कर्क रोग आहे. सद्याचे राज्यकर्ते लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे कामगारांचा संपाचा, संघटित होण्याचा, सामुहिक वाटाघाटीचा हक्क हिरावण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे.

हिंद मजदूर किसान पंचायत ही संघटना डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचे लोण समाजापर्यन्त पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे ह्या संघटनेकडून मोठया अपेक्षा आहेत, असेहि त्या शेवटी म्हणाल्या.

<u>कामगार वर्गाची लढाई केवळ आर्थिक मागण्यांसाठीच नसून ती सामाजिक परिवर्तनासाठीहि आहे</u>

महाराष्ट्र जनता दलाचे महासचिव खासदार डॉक्टर बापूसाहेब काळदाते ह्यांनी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणांत ते म्हणाले की, कामगार वर्गाची लढाई ही केवळ आर्थिक मागण्यांसाठीच नसून सामाजिक परिवर्तनाची आहे, हे विसरून चालणार नाही. आज सत्तेवर असलेले सरकार कामगार वर्गाविरुध्द जे धोरण आखत आहे त्या कामगार द्रोही सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठीच नव्हे तर त्या विरुध्द संघर्ष करण्याचे काम हिंद मजदूर किसान पंचायत करीत आहे

कामगार द्रोही ह्या सरकारला येत्या निवडणूकीत मूठमाती देण्यासाठी कामगार वर्गाने जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चाच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

हिंन्द मजदूर किसान पंचायतीस राजकीय कार्यात जनता दल व राष्ट्रीय मोर्चात स्वतःला जोडून घेतल्याबद्दल खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते ह्यांनी हिंमकिपं नेते-आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

<u>जात्यांधानी धर्माच्या नावाखाली कामगार वर्गात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरु केलेले असून राजीव गांधींनी देश गहाण ठेवलेला आहे.</u>

...(3)

हिंद मजदूर किसान पंचायतचे सरचिटणीस झुंजार कामगार नेते साथी शरद राव ह्यांनी आपल्या तडाखेबंद भाषणात धर्माच्या नावाखाली कामगार वर्गात फूट पाडण्याचा प्रयत्न करणा-या जात्यांधांवर कटक टीका केली.

श्री शरद राव आपल्या भाषणांत पुढे म्हणाले की, सरकार अत्याधुनिकीकरणकरून नोकर कपात करीत असून बेकारांच्या संख्येत भर टाकीत आहे. साखर, चहा, पेट्रोल, तेल, वीज, कोळसा इत्यादि अत्यावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून भाववाढ करण्यास मदत करीत असून कामगार वर्गा विरूध्द विविध काळे कायदे करून तर फेरीवाले, ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक-मालकांसारख्या स्वयंरोजगार करणा-या विरूध्द जाचक अटी व नियम तयार करून अन्याय करीत आहे, महागाई वाढत असतानाहि निर्देशांकात चोरी करून महागाई भत्यांत कपात करणारे व व्यवसाय करांत वाढ करून किरकोळ विक्रेत्यांसह सर्वांवरच अन्याय करणारे हे सरकार कामगार वर्गाने आपल्या संघटित ताकदीच्या जोरावर आगामी निवडणूकीत पदभ्रष्ट केले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, ग्राम पंचायत बील व नगरपालिका बिलाच्या निमित्ताने केन्द्र सरकार सर्व सत्ता आपल्याच हाती घेऊ पाहत आहे. सत्तेचे केन्द्रियकरण करण्याचा हा प्रकार लोकशाही तत्वाची पायमल्ली करणारा आहे

२१ व्या शतकाकडे जाण्याच्या निमित्ताने आधुनिक यंत्र सामुग्री आणून सद्या असलेल्या नोक-या नष्ट केल्या जात आहेत तर हजारो कोटी रूपये केवळ डामडौल व मौजमजेखातर, परदेशी वस्तू खरेदी करून देशाला परकीय व स्वकीय कर्जानी जखडून टाकलेले आहे. एक प्रकारे हा देश राजीव गांधीनी गहाण ठेवलेला आहे., असेहि ते म्हणाले.

गत अडीच वर्षाच्या हिंमकिपं च्या कार्याचा आढावा घेताना सरचिटणीस श्री शंकर साळवी ह्यांनी हिंमकिपं आयोजित मुंबईसह महाराष्ट्रात झालेल्या आंदोलनात्मक व सामाजिक कार्याची माहिती आपल्या अहवालांद्वारे सादर केली. तथापि ह्याहिपेक्षा प्रभावी व प्रखर आंदोलने आदि कार्यक्रम व्हावयास हवे होते, असेहि ते म्हणाले.

भूकेच्या लढाईत धर्म नसतो

आपल्या अध्यक्षीय भाषणांत साथी जगन्नाथराव जाधव म्हणाले की, धर्मान्ध लोक कामगार चळवळींत फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. भूकेच्या लढाईत धर्म नसतो. हिंदू असो वा मुस्लिम भूक ही सर्वांनाच असते. आणि मालक हिंदू असो किंवा मुस्लिम त्याची कामगार वर्गाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असू शकत नाही. त्यामुळे कामगार संघटनांनी कामगार द्रोहि शक्तिंचा मुकाबला करण्याची आज गरज निर्माण झालेली आहे.

महागाई, बेकारी, भ्रष्टाचार आदि प्रश्न सोडवावयाचे असतील तर राजकीय परिवर्तनाच्या आंदोलनांत सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी केले.

ह्या अधिवेशनासाठी हिंद मजदूर किसान पंचायतचे अध्यक्ष व जनता दल नेते साथी जॉर्ज फर्नांडिस उपस्थित राहणार होते. परंतु, साखरेच्या कृत्रिम टंचाई विरोधी निदर्शने करण्याच्या कारणावरुन मुजफ्फरपूर (बिहार) येथे सरकारने त्यांना अटक केल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत.

ह्या अधिवेशनांत जॉर्ज फर्नांडिस व नागपूर येथील समाजवादी चळवळीत सहभागी असणारे पत्रकार हर्षवर्धन आर्य ह्यांच्या अटके बाबत, झोपडपट्टीवासीयांना पर्यायी घरे व सर्व अत्यावश्यक सेवा-नागरि सेवा-सुविधा उपलब्ध कराव्यांत, किमान वेतनाची अंमलबजावणी व अन्य सेवा सवलती, बंद कापड गिरण्या व अन्य उद्योग पूर्ववत सुरु करणे, बोनस कायद्यांत सुधारणा, टेल्को कामगारांच्या लढयाला पाठींबा, स्वयंरोजगार करणारे फेरीवाले, टॅक्सी-रिक्षा चालक-मालकांवर लादण्यांत आलेले जाचक कर रद्द करा आदि मागण्यांबाबत राजकीय आर्थिक व सामाजिक ठरावासह एकूण ११ ठरावांवर चर्चा होऊन ते मंजूर करण्यांत आले.

विदर्भ - मराठवाड्यातील अनेक संघटना हिंमकिपं मध्ये सामील

ह्या अधिवेशनांत विदर्भ मराठवाड्यातील अनेक कामगार संघटना हिंद मजदूर किसान पंचायतमध्ये सामील झाल्या. हिंमकिपं च्या वतीने त्यांचे स्वागत करण्यांत आले.

हिंमकिपं (महाराष्ट्र) च्या अध्यक्षपदी महाबळ शेट्टींची निवड

येत्या २ वर्षासाठी महाराष्ट्र हिंद मजदूर किसान पंचायतच्या कार्यकारिणीची निवड करण्यांत आली. बृहन्मुंबई महापालिका कामगार-कर्मचा-यांचे नेते साथी

...(५)

महाबळ शेट्टी ह्यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली. साथी शंकर साळवी ह्यांची सरचिटणीस म्हणून व साथी अशोक वायकुळ ह्यांची खजिनदार म्हणून फेरनिवड करण्यांत आली.

साथी जगन्नाथराव जाधव, (रत्नागिरी), शांताराम चव्हाण(नाशिक) उमेश चौबे (नागपूर), जगन्नाथ पाठक (मुंबई), जी. ए. इनामदार – पिंपरी-चिंचवड प्रभाकर म्हात्रे(वसई), श्रीमती कल्पना बुडे (मुंबई), बी. जी. मेश्राम(नागपूर), व सुरेशचंद्र बोबडे (अमरावती) ह्यांची उपाध्यक्ष म्हणून तर साथी हुसेन दलवाई(रत्नागिरी) सदा कामतेकर(मुंबई), भरत कावळे(नाशिक), पद्मनाभ शेट्टी(मुंबई), अशोक पेंढारी (वसई) आणि साथी मदन थूल (नागपूर) ह्यांची सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात येवून अन्य ६३ कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यांत आली. ह्या शिवाय एक कार्यक्रम समिती नियुक्त करण्यांत आली.

नव-निर्वाचित अध्यक्ष साथी महाबळ शेट्टी ह्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर केलेल्या भाषणांत पुढील दोन वर्षांत होणा-या सर्व कार्यक्रमांत सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

३० सप्टेंबर रोजी दुपारी कार्यकर्ता सम्मेलनाची सांगता झाल्यानंतर सायं० ४.३० वाजता सोखता भवन गांधी बाग येथून एक प्रचंड मोर्चा काढण्यांत आला. ह्या मोर्चाचे हिन्दी मोर भवनाच्या प्रांगणांत जाहीर सभेत रूपांतर झाले. हजारो पुरूष – महिला कामगार उपस्थित होते. श्रीमती मृणाल गोरे, जगन्नाथराव जाधव, रघु ठाकूर, लाडली मोहन निगम, बापूसाहेब काळदाते, शरद राव, महाबळ शेट्टी शंकर साळवी, उमेश चौबे, हरिष अड्यालकर, बी. जी. मेश्राम आदि नेत्यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

जाहीर सभेत भाषण करताना खासदार धाबे ह्यांनी जॉर्ज फर्नांडिस यांनी मांडलेल्या "कामगार संसद" कल्पनेची स्तुती करून कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा हा एक मार्ग असल्याचे प्रतिपादन केले.

ह्या द्विवार्षिक राज्य अधिवेशनासाठी हिंमकिपं च्या नागपूर येथील सर्व लहान-थोर कार्यकर्त्यांनी व संघटनांच्या पदाधिका-यांनी विशेष परिश्रम घेतले. विशेषत: उमेश चौबे, हरिष अड्यालकर, मदन थूल, मनसुख हेडाव, मन्नु दत्ता, इत्यादिंच्या अथक प्रयत्नामुळे हे अधिवेशन फार चांगल्या प्रकारे पार पडले. अधिवेशनाच्या पोस्टर्स बॅनर्स व पताकांनी संपूर्ण शहर सजलेले होते.

..000...